Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 07 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०७ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

देशात एच एम पी व्ही या विषाणूचे रुग्ण आढळल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य सचिवांनी आज सद्य:स्थितीचा आढावा घेतला. देशातल्या श्वसनाच्या आजारांची सद्य:स्थिती आणि त्यांच्या व्यवस्थापनासाठी सार्वजनिक आरोग्य उपायांसंबंधी त्यांनी माहिती जाणून घेतली. राज्यांनी श्वसनाच्या आजारांवर आणि त्यांच्या प्रसारांवर देखरेख ठेवावी आणि योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

****

देशात बिहार, दिल्ली नोएडा, आणि सिक्कीमच्या काही भागात तसंच नेपाळमध्ये आज भूकंपाचे जोरदार धक्के बसल्याचं वृत्त आहे. सकाळी सहा वाजून ४० मिनिटांनी हा भूकंप जाणवला. नेपाळमधल्या लोबुचे पासून ९३ किलोमीटर अंतरावर ईशान्येकडे या भूकंपाचा केंद्रबिंदू आहे. नेपाळमध्ये या भूकंपाची तीव्रता सात पूर्णांक एक रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली.

****

केंद्रीय अन्वेषण विभागानं विकसित केलेल्या भारतपोल पोर्टलचा प्रारंभ केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहाय्यासाठी येणार्या सर्व विनंत्यांची इंटरपोलद्वारे प्रक्रिया सुविहित करण्याचं काम भारतपोल पोर्टलच्या माध्यमातून करण्यात येईल. त्यामध्ये रेड नोटिस जारी करण्यासह इतर नोटिसांचा समावेश आहे.

****

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल अर्थसंकल्पपूर्व चर्चेसाठी आठवी बैठक घेतली. या बैठकीत विविध संबंधित घटकांच्या प्रतिनिधींसह कामगार संघटनांचे प्रतिनिधी देखील सहभागी झाले होते.

****

ग्राहकांच्या मागणीनंतर चांदी आणि चांदीच्या वस्तूंसाठी हॉलमार्किंग बंधनकारक करण्याचा विचार करण्याची सूचना, ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी भारतीय मानक ब्युरोला केली आहे. नवी दिल्लीत भारतीय मानक ब्युरोच्या ७८ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते. भारतीय मानक ब्युरोनं त्याच्या स्थापनेपासून विविध क्षेत्रांमध्ये मानके तयार करणं, त्याची अंमलबजावणी करणं आणि प्रोत्साहन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असल्याचंही ते म्हणाले.

****

खाद्यतेल उत्पादनात स्वयंपूर्णतेचं उद्धिष्टं गाठण्यासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत सर्व राज्यांनी प्रयत्नांना अधिक गती द्यावी, असं आवाहन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्लीत, याबाबत आयोजित बैठकीत बोलत होते. आयातीवरचं अवलंबित्व कमी करण्याच्या भारताच्या महत्वाकांक्षेचा भाग म्हणून या मोहिमेअंतर्गत २०२५-२६ पर्यंत साडेसहा लाख हेक्टर क्षेत्र ऑईलपामच्या लागवडीखाली आणण्याचं उद्धिष्ट असल्याचं, चौहान यांनी सांगितलं.

****

राज्याच्या लोकायुक्त कार्यालयानं २०२३ मधये चार हजार ५५५ प्रकरणं निकाली काढली, तर वर्षअखेर चार हजार ८१८ प्रकरणं प्रलंबित राहिली. राज्याचे लोक आयुक्त वि. मु. कानडे, आणि उप लोकआयुक्त संजय भाटिया यांनी काल राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भेट घेऊन आपल्या कामकाजासंबंधीचा ५१ वा वार्षिक एकत्रित अहवाल सादर केला. त्यात ही माहिती देण्यात आली.

****

राज्य सरकारच्या ४८५ सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देणारं 'आपलं सरकार' हे वेब पोर्टल अधिक अद्ययावत करण्याचे, तसंच 'आपलं सरकार' चं मोबाईल ऍप तयार करण्याचे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी दिले. जम्मू काश्मीर, तमिळनाडू आणि कर्नाटक ही राज्ये ऑनलाईन सेवा देण्यात आघाडीवर आहेत. त्याचा अभ्यास करुन राज्य सरकारच्या अतिरिक्त २८५ सेवा ऑनलाईन देण्याची तयारी माहिती तंत्रज्ञान विभागाने केली आहे.

****

प्रत्यक्ष लाभार्थींपर्यंत गृहनिर्माण योजनेचा लाभ पोहोचवण्यासाठी अशा प्रकल्पांना गती द्यावी, प्रकल्पांची कामं तातडीने सुरू करावीत, असे निर्देश, गृहनिर्माण

राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले आहेत. विभागाच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. ज्येष्ठ नागरिक धोरण २०२४, प्रधानमंत्री आवास योजना, गिरणी कामगारांना घरे, सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना, धोकादायक इमारतींचा पुनर्विकास या विषयावरही यावेळी चर्चा करण्यात आली.

****

नांदेड इथं काल पत्रकार दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, विविध पत्रकार संघटना आणि जिल्हा माहिती कार्यालयामार्फत आयोजित या कार्यक्रमात जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी, `कृत्रिम बुद्धीमत्ता आणि बातमीदारी`, या विषयावर मार्गदर्शन केलं. बदलत्या काळानुसार प्रत्येक क्षेत्रात एआय अर्थात कृत्रिम बुध्दीमत्ता वापरुन दैनंदिन कामं अधिक गतीमान आणि अचूक करण्यावर भर देण्यात येत आहे. माध्यम प्रतिनिधींनीही गुणवत्तापूर्ण बातमीदारीसाठी जागरूकतेने पत्रकारितेत कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करावा, असं जिल्हाधिकारी म्हणाले.

****

लातूर इथं सुरू असलेल्या २० व्या नांदेड परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धांचा आज समारोप होत आहे. या चार दिवसीय स्पर्धांमध्ये हॉकी तसंच जलतरण आदी स्पर्धेत लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोलीच्या पोलीस खेळाडू सहभागी झाले आहेत.

****

नांदेड-मनमाड-नांदेड डेमू रेल्वे नांदेड ते पूर्णा दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. आजपासून ते ३१ जानेवारी दरम्यान ही गाडी पूर्णा ते मनमाड अशी धावेल.

****